मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

प्रसिद्ध पत्रक

## ❖ मिरा भाईंदर शहरातील दूध वितरण केंद्रे महानंदाकडे सुपूर्द - नागरिकांना मिळणार दर्जेदार दुग्धउत्पादने

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एकूण 69 दूध वितरण केंद्रांचे व्यवस्थापन आणि वितरण महानंदा डेअरीकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. यापैकी 5 दूध वितरण केंद्रांचे नूतनीकरण महानंदा डेअरीच्या वतीने विविध सुविधांसह पूर्ण करण्यात आले आहे. दि. 18 नोव्हेंबर 2025 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महानंदा डेअरीचे मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री. पी. बी. परमार यांच्या विशेष उपस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयात हा महत्वाचा निर्णय घेण्यात आला.यावेळी शहर अभियंता दिपक खांबित तसेच मनपाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

तसेच मा. आयुक्तांच्या हस्ते 5 नूतनीकृत दूध वितरण स्टॉलचे वाटप करण्यात आले असून उर्वरित स्टॉलचे वाटप लवकरच पार पडणार आहे.या निर्णयामुळे स्टॉलधारकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना आता महानंदा डेअरीच्या विविध प्रकारच्या ताज्या व उच्च प्रतीच्या दुग्धजन्य पदार्थांचा लाभ मिळणार आहे.महानंदा डेअरीच्या विशेष सहभागामुळे दूध वितरण व्यवस्थेला नवी गती मिळणार आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील नागरिकांची सेवा अधिक सक्षम, आणि विश्वासार्ह करण्याचा प्रयत्न मिरा भाईंदर महानगरपालिका सातत्याने करीत आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका